# नियोजनाकडे दुर्लक्ष झाल्याने पाणीप्रश्न गंभीर

## प्रसाद कुलकर्णी यांचे प्रतिपादन : कमला कॉलेजमध्ये 'प्रश्न पाण्याचा' विषयावर कार्यशाळा

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

भारत आणि त्यातही महाराष्ट्रावर पाण्याबाबत निसर्गाने वरदहस्त ठेवलेला आहे. पाण्याबाबत आपण संपन्न आहोत हे वास्तव असूनही पाण्याचे योग्य नियोजन आणि पाण्याचा पुनर्वापर याकडे दुर्लक्ष झाल्याने पाणीप्रश्न गंभीर बनत आहे, असे प्रतिपादन इचलकरंजीतील समाजवादी प्रबोधनीचे सरचिटणीस प्रसाद कुलकर्णी यांनी केले.

डॉ. जे. एफ. पाटील अमृत महोत्सव सत्कार समिती व कमला कॉलेजमधील अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'प्रश्न पाण्याचा' या विषयावर ते बोलत होते. संस्थेचे सचिव डॉ. क्रांतीकुमार पाटील अध्यक्षस्थानी होते.

कुलकर्णी पुढे म्हणाले, तत्कालिक उपायांपेक्षा दीर्घकालीन धोरणे अधिक उपयुक्त ठरू शकतील. पाण्याचे दुर्भिक्ष्य दूर करण्यासाठी हजारो खेड्यांमधून पाण्याचे टँकर पाठवावे लागतात. मानवनिर्मित चुकांवर निसर्गाचा कोप म्हणून पांघरूण घालणे चुकीचे आहे. भारताला प्रचंड मोठा समुद्र किनारा लाभला आहे. त्या पाण्याचे नि:क्षारीकरण करून पाण्याची उपलब्धता वाढविणे शक्य आहे. भूगर्भातील पाणी जपून वापरणे गरजेचे आहे. पाण्याचे योग्य नियोजन जलसाक्षरता हाच पाणी प्रश्नावर एकमेव उपाय ठरू शकतो.




**कोल्हापूर : कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्रसाद कुलकर्णी. सोबत डॉ. पी. बी. कुलकर्णी, डॉ. क्रांतीकुमार पाटील, डॉ. जे. एफ. पाटील, प्राचार्य डॉ. जे. बी. पाटील आदी.**

अध्यक्षस्थानावरून डॉ. क्रांतीकुमार पाटील म्हणाले, पाणी म्हणजे जीवन आहे. पाण्याचा काटकसरीने वापर केला पाहिजे. पाण्याचा विध्वंस थांबला पाहिजे. स्रोत जतन करून ठेवणे, तसेच वृक्ष लागवड करणे गरजेचे आहे.

डॉ. पी. बी. कुलकर्णी यांनी डॉ. जे. एफ. पाटील अमृत महोत्सव सत्कार समितीची भूमिका मांडताना सांगितले, जो निधी संकलित केला जाणार आहे, त्यामधून सांगली, सोलापूर, कोल्हापूर, सातारा या चार जिल्ह्यांमध्ये 'प्रश्न पाण्याचा' या विषयावर तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित केली जाणार आहेत. . डॉ. नेताजी पोवार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अनघा पाठक यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. सुभाष दगडे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. एस. एम. भोसले, प्राध्यापक, विद्यार्थी आदी उपस्थित होते.

Scanned by CamScanner